नि.क्र. १५८

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०८ याची जबानी –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : राजेश सुरेश गायतोंडे
वय सुमारे : ५५ वर्षे, धंदा – व्यवसाय
निवासस्थान : राहा. बोरीवली, मुंबई

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत–**

**०१.** झिलू विष्णू गावडे यांच्या तक्रारीबददल पोलीसांनी माझेकडे कधीही चौकशी केली अथवा माझा जबाब नोंदविला नाही. माझे ओरोस येथील जमीनीबाबत घटना घडली होती. माझी जमीन ओरोस मध्ये होती, ती जमीन माझे वडीलांच्या नावे होती. ती जमीन माझे आजोबांची वडीलोपार्जित जमीन असून त्यामध्ये इतरही हक्कदार आहेत. २००९ साली माझे वडील सुरेश जनार्दन गायतोंडे वारले, त्यानंतर मी जमीनीच्या ७/१२ पत्रकी माझे नाव लावण्यासाठी ओरोसच्या तलाठी ऑफिसमध्ये गेलो असता माझे लक्षात आले की ७/१२ वर वडीलांचे नाव नसून ती विकली गेली आहे व भलत्याच संस्थेचे नाव लागले आहे. त्यानंतर मी त्याबाबतचे फेरफार व खरेदीखत पाहीले. मला सांगीतले गेले की, माझे वडीलांनी ती जमीन विकली आहे. मी त्या खरेदीखतावरील फोटो पाहून सांगीतले की, ते माझे वडील नाहीत. त्या खरेदीखतावरील फोटो माझे वडीलांचा नव्हता तो आमच्याच नात्यातील चुलत चुलत काका राजन नारायण गायतोंडे यांचा होता. त्यासंदर्भातील रितसर तक्रारी अर्ज मी ओरोस पोलीस ठाण्यात जावून दाखल केला. मला ते खरेदीखत दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला निशाणी १३५ वरील खरेदीखत दाखविण्यात आले. मी पाहीलेले खरेदीखत तेच आहे का हे मी निश्चीत पणे सांगू शकत नाही. पण ते तसेच होते त्यावरील फोटो तोच होता, ते किती दस्त होते मला आठवत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की दोन होते. मी दोन्ही पाहीले होते. आता मला नि.१३६ वरील खरेदीखत दाखविले. तो दस्त मी पाहीला होता तो तशाच स्वरुपाचा होता. त्यावर राजन नारायण

गायतोंडे यांचा म्हणून लावलेला फोटो माझे वडीलांचा नाही व त्यावर केलेली सही माझे वडीलांची नाही. असे काही झाले नाही की, झिलू विष्णू गावडे यांनी याच जमीनीबाबत पोलीसांत तक्रार केली होती व पोलीसांनी माझे कडे त्याबाबत तक्रार केली होती.

**<u>साक्षीदार सरकार पक्षास मदत करीत नसल्याने सरकारी वकीलांनी साक्षीदाराचा उलटतपासाचे स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवागनी देण्यात आली.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, झिलू गावडे हे सदर जमीनीत कुळ हक्कदार होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमीनीच्या व्यवहारासंदर्भात झिलूने पोलीसात तक्रार केली होती व पोलीसांनी त्याबाबत माझेकडे चौकशी केली होती. सदरचे खरेदीखत नेमक्या कोणत्या क्षेत्राबाबत झाले होते हे मला नीट आठवत नाही. त्या दस्तावरुन मला कळले की, ती जागा राजन गायतोंडे यांनी गुरुनाथ गायतोंडे यांना विकली व गुरुनाथ गायतोंडे यांनी एका ख्रिश्चच संस्थेला विकली. मी राजन गायतोंडे यांना ओळखतो व गुरुनाथ गायतोंडे यांना ओळखतो. ते दोघेही आज दिसत नाहीत. इतकी वर्षे झाली असल्याने व १५ वर्षे आम्ही न भेटल्याने मी त्यांना नीट ओळखू शकत नाही. मी तक्रार दिली त्यावेळेस मी माझे वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र, त्यांचा फोटो व त्यांच्या ऑफिसच्या ओळखपत्राची झेरॉक्स दिल्याचे आठवते. त्यानंतर माझेकडे कोणीही चौकशी केली नाही.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, झिलू विष्णू गावडे यांनी पोलीसांत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या अनुशंगाने पोलीसांनी माझेकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. आता मला चार्जशिट मधील अनुक्र. २३ वरील माझे नावे असलेले टिपण दाखविले. त्यातील परिच्छेद ३ मधील मजकूर "आता मला....माझे सांगणे" हा मजकूर पोलीसांना सांगीतला नव्हता. त्यास पोरशन मार्क–अे करण्यात आले. साक्षीदार पुन्हा सांगतो की माझा जबाब पोलीसांनी कधीही नोंदविला नाही.

**सरतपास पूर्ण**

**<u>पहिल्या सत्राची वेळ झाल्याने उलटतपास दुपार सत्रापर्यत तहकुब केला.</u>**

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2025.11.18 11:38:57 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–१७/११/२०२५.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

**<u>दुस–या सत्रात आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री. एस. एस. सावंत यांचे मार्फत</u> –**

**०४.** मी बीएएसी, एम.ए. व ज्ञानेश्वरीवर डॉक्टरेट केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा जन्म व संपूर्ण शिक्षण मुंबई येथेच झाले. माझे कुटुंबातील माझे भाऊबंदांचे देखील जन्म व शिक्षण मुंबई येथेच झाले. माझी बहिण प्रॅक्टींसिंग वकील आहे. आजतागायत मी ओरोस येथे हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या वेळीच आलेलो आहे. माझे वडीलोपार्जित घर अत्यंत जुने असल्याने मी गावी आलो की कुडाळ येथेच राहतो.

**०५.** मी अथवा माझे कुटुंबातील कोणाही सदस्यानी झिलू गावडे यांना या घटनेबाबत फिर्याद वगैरे देण्यास प्राधिकृत केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, झिलू गावडे व त्यांच्या कुंटुबियांचा याप्रकरणात नमूद जमीनीशी कुळ म्हणून काडीमात्र संबंध नाही. या प्रकरणातील घटनेबाबत त्यांना फिर्याद देण्याचा अधिकार आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही सक्षम अधिका–यानी/ न्यायालयाने झिलू गावडे यांना या प्रकरणातील जमीनीचा कुळ म्हणून घोषीत केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ओरोस पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीबाबत नंतर माझी काहीही तक्रार राहीली नसल्याने मी त्याचा पाठपुरावा केला नाही.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, मी तलाठी कार्यालयात पाहिलेले खरेदी दस्त व मला आजरोजी सरकारी वकीलांनी दाखविलेले नि.१३५ व १३६ वरील दस्त एकच आहेत असे मी खात्रीने सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते मुळ खरेदीखत

मला पाहण्याचा कधीही योग आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादया दस्तावरील फोटोतील व्यक्ती ओळखण्यासाठी त्या दस्ताच्या झेरॉक्स पेक्षा मुळ दस्त असणे सोईचे असते. हे म्हणणे खरे आहे की, एखादया व्यक्तीस दोन चार वेळाच पाहीले असल्यास त्या व्यक्तीला आठवणे कठीण असते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील तथाकथीत दस्ताबाबत माझी अथवा माझे कुटुबियांची कोणतीही तक्रार राहीलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी कोणतीही तक्रार राहीलेली नसल्याने झालेल्या फेरफाराबाबत मी कोणतीही न्यायालयीन कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजन गायतोंडे हे आमचे चुलत चुलत नातेवाईक आहेत, जवळचे नातेवाईक नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, राजन गायतोंडे २००० साली कसे दिसत होते, २००७ साली कसे दिसत होते व सध्या कसे दिसतात याचे मला आकलन नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या हिताविरध्दचा असणारा माझे सरतपासातील व सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासतील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास** – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2025.11.18 11:39:05 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–१७/११/२०२५.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.